पुढारी

7/10/2023



सावर्डे : कथा लेखन कार्यशाळेस उपस्थित मार्गदर्शक सुनीता तांबे. सोबत माजी सभापती पूजा निकम, ज्येष्ठ चित्रकार प्रकाश राजेशिर्के आदी.

# मोकळे होण्यासाठी लिहीत राहा : सुनीता तांबे

सावर्डे : पुढारी वृत्तसेवा

कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे जिल्हास्तरीय कथालेखन कार्यशाळा दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत झाली. यावेळी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून लेखिका सुनीता तांबे यांनी, लेखक होणे सोपं नाही. गायकाला ज्या प्रमाणे रियाज करावा लागतो. त्या प्रमाणे लेखला लिखाणाचा सराव करावा लागतो. भरपूर वाचन करा आपल्याला जो विषय सुचतो, लिहावासा वाटतो तो लिहा. यामुळे तुही मोकळे व्हाल, असे प्रतिपादन केले.

यावेळी सौ. तांबे यांनी कथेची सुरुवात, मध्य आणि शेवट कसा करावा तसेच तुमची भाषशैली स्वतंत्र असावी अशा काही महत्वाच्या टीप्स देण्यात आल्या. विद्यार्थ्यांकडून कथेचे प्रात्यक्षिक करून घेऊन त्यांच्यातील लेखक जागा केला. सुरुवातीला सेक्रेटरी महेश, महाडिक सुनीता तांबे याच्या हस्ते स्व. गोविंदारावजी निकम यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. चित्रकार प्रकाश राजेशिर्के यांनी सौ. तांबे यांचा सत्कार केला. प्रास्ताविक प्रा. तानाजी कांबळे यांनी केले. यावेळी आमदार शेखर निकम यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास माजी सभापती पूजा निकम, प्राचार्य मंगेश भोसले, सुजाता राजेशिर्के, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, नवलेखक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती शेवेकर यांनी केले.




चिपळूण : आरोग्य शिबिरप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डेत आरोग्य शिबिर उत्साहात

**चिपळूण : पुढारी वृत्तसेवा**

कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर बाळासाहेब माटे शासकीय कुटीर रुग्णालयच्यावतीने घेण्यात आले. सुवर्णा मोरे, जयश्री सुतार, संकेत कदम, अक्षरा जाधव यांनी यासाठी सहकार्य केले.

या शिबिरात टीमने विद्यार्थ्यांची विविध तपासण्या केल्या. शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास कक्ष यांच्यावतीने करण्यात आले. या शिबिरात सी. बी. सी., हिमोग्लोबीन आदी तपासण्या करण्यात आल्या. तसेच, विद्यार्थ्यांना आहार आणि जीवनशैली याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी स्वागत केले तर अनुष्का काजरोळकर यांनी आभार मानले.

पुढारी

4/10/23



सावर्डे : एक तास स्वच्छता उपक्रमात सहभागी कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डेच्या विद्यार्थिनी.

# सावर्डे महाविद्यालयात श्रमदानातून स्वच्छता मोहीम

सावर्डे : कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे 'एक तास स्वच्छता' अभियान अंतर्गत श्रमदानातून स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालय वर्ग खोल्या ग्रंथालय व परिसरात स्वच्छता करण्यात आली. यावेळी स्वच्छतेचे महत्त्व प्राध्यापक टी. वाय. कांबळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ केला. यावेळी प्रा. जयसिंग चवरे, प्रा. दीप्ती शेंडेकर, प्रा. प्रसाद कदम यांनी सहकार्य केले. महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनीही सहभाग घेतला. सुषमा काजरोळकर यांनी सर्वांचे आभार मानले.

29/4/2023

पुढारी



सावर्डे : कला व विज्ञान महाविद्यालयात पदवीदान समारंभात उपस्थित प्राचार्य डॉ. सुनीतकुमार पाटील.

# कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डेत पदवीदान समारंभ

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे नुकताच पदवीदान समारंभ कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनीतकुमार पाटील उपस्थित होते. बी. ए.,बी.कॉमच्या विध्यार्थ्यांना डॉ. पाटील यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर स्पर्धा किती आहे हे लक्षात येईल. तरीही उच्च शिक्षणाबरोबरच कौशल्य शिक्षण घेत उद्योग आणि शेतीबरोबर स्पर्धा परीक्षेला अभ्यास करून सामोरे जा. आरती खेडेकर, सूरज जोगळेकर यांनी स्पर्धा परीक्षेत जे यश मिळवले त्याचा मला अभिमान असल्याचे सांगितले. स्टाफ सिलेक्शनमधून सांख्यिकी विभागात सूरज जोगळेकर याची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य तानाजी कांबळे यांनी केले. कार्यक्रमाला सूरज जोगळेकर, नेहा पाटणकर, कामिनी शिंदे, प्राची कांबळे तसेच दीप्ती शेम्बेकर, संकेत कुरणे, जयसिंग चावरे, मेधा सावर्डेकर, सुनील जावीर उपस्थित होते.

पुढारी

# सावर्डे महाविद्यालयात पुस्तक दिन


**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक पुस्तक दिनानिमित्त सह्याद्री शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालयात कार्यक्रम झाला. पुस्तक दिनाचे महत्त्व सांगताना प्रा. तानाजी कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कांबळे म्हणाले, आपल्या आयुष्यात गुरु आई, शिक्षक आणि पुस्तक हे आपल्याला नेहमीच मार्गदर्शन करतात. पुस्तकातून जे ज्ञान मिळते ते आपणास विचार करावयास लावते. देश, समाज, शिक्षणाविषयी त्यांनी मांडलेले विचार, पुस्तके आजही प्रेरणादायी आहेत.

यशस्वी मनुष्य हा नेहमी अनुभवातून जसा शिकतो तसाच चांगल्या विचाराने सुसंस्कृत बनतो. एकच प्याला, आई समजावून घेताना, उपरा ही पुस्तके आजही अमर आहेत. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्या म्हणजे कोकणचे अस्सल दर्शनच आहे. जीवनातला निखळ आनंद घ्यावयाचा असल्यास पुस्तकांशिवाय पर्याय नाही, असे कांबळे म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रा. सुनील जावीर, प्रा. संकेत कुरणे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी उपस्थितांचे आभार अनुष्का काजरोळकर यांनी मानले. महाविद्यालयातील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.




सावर्डे : पुस्तक दिन कार्यक्रमावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य तानाजी कांबळे, सोबत शिक्षक.

Ratnagiri Edition
Apr 28, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in



सावर्डे : निवासी शिबिराअंतर्गत नदीवर बंधाऱ्यासाठी श्रमदान करताना विद्यार्थी.

# कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डेचे रासेयो निवासी शिबिर

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डेचा राष्ट्रीय सेवा योजनेचा निवासी कॅम्प असुर्डे आंबतखोत झाला. यामध्ये ५० विद्यार्थी सहभागी सहभागी झाले होते.

याअंतर्गत गावात स्वच्छता तसेच पाणी वाचवा याविषयी प्रभात फेरी काढण्यात आली. वसंत शंकर देसाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्यामागे नदीवर बंधारा बांधण्यात आला. या शिबिरात. अंधश्रद्धा - बापूसाहेब जमादार, पाणी म्हणजे जीवन - जे. बी.शिंदे, रस्ता सुरक्षा - संजय नकाते, राष्ट्रीय विकासात तरुणांचा सहभाग- प्रतापसिंह यादव, सायबर सुरक्षा- सुजाता मोहिते, जीवनमूल्ये - भानुदास देसाई यांची व्याख्याने झाली.

समारोप प्रसंगी सेक्रेटरी महेश महाडिक यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. मुख्याध्यापक अमर भाट यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. तानाजी कांबळे यांनी सर्वांचे आभार मानले.